| | | |
|---|---|---|
| | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>भ्रमरध्वणी क्र.9819208279 | |

**प्रेसनोट** **दिनांक १८.१०.२०२४**

# कळवा पोलीस स्टेशनची उल्लेखनिय कामगिरी

## ‘‘मिसींग झालेले ७,२०,०००/— रू कि.चे एकुण ६५ मोबाईल फोन हस्तगत’’

---

सन २०२३—२०२४ मध्ये कळवा पोलीस स्टेशनला विविध व्यक्ती/महिला (तक्रारदार) यांनी त्यांचे मोबाईल फोन गहाळ झालेबाबत दिलेल्या तक्रारी वरून प्रॉपर्टी मिसींगला नोंदी घेण्यात आलेल्या होत्या. सदरबाबत मा.वरिष्ठांनी मिसींग झालेल्या मोबाईलचा शोध घेवुन संबधीतांना मुद्देमाल परत देण्याबाबत सक्त सुचना देवुन मार्गदर्शन केलेले होते.

मोबाईल फोनच्या मिसींग संबधाने गांभीर्य ओळखुन व.पो.निरी.श्री.अशोक उतेकर, कळवा पो.स्टे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.शि/८०६६ प्रशांत लवटे व इतर स्टाफ यांना सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यावर त्यांनी सी.ई.आय.आर या कार्यप्रणालीमध्ये मोबाईल मिसींगची माहिती फिडींग करून तसेच मा.पोलीस उप आयुक्त सो., परि—०१, ठाणे यांच्या मार्फतीने संबधीत मोबाईल कंपनीस पाठपुरावा करून सन २०२३—२०२४ मध्ये मिसींग झालेल्या मोबाईल फोन संबधाने तांत्रीक व इतर माहिती प्राप्त करून संबधीतांचा शोध घेवुन त्यांच्याकडुन इतर पोलीस अंमलदार यांच्या मदतीने विविध कंपनीचे एकुण ६५ मोबाईल फोन हस्तगत करून सदरचे मोबाईल संबधीतांना परत करण्यात आलेले आहे.

सदर उल्लेखनिय कामगिरीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अशोक उतेकर, कळवा पोलीस स्टेशन यांनी पोलीस निरीक्षक, गुन्हे, अनिल गायकवाड, पो.उप.निरी.सागर सांगवे, पोहवा/४४४६ शहाजी ऐडके, पोहवा/६६१४ राहुल पवार, पोहवा/६६७५ श्रीमंत राठोड, पोहवा/६९६९ गणेश बांडे, पोहवा/६१०८ अनिल खुस्पे, पोशि/२७५५ अमोल ढावरे, पोशि/४४११ नामदेव कोळी, पोशि/८०६६ प्रशांत लवटे यांना दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे गुन्हयातील मिसींग झालेल्या मोबाईल फोन संबधाने काहीएक माहिती उपलब्ध नसताना कौशल्यपुर्वकपणे तांत्रीक व इतर माहितीच्या आधारे उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

( शैलेश साळवी )<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क<br>
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,<br>
ठाणे शहर